MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Refereed Research Journal

Issue-34, Vol-03 April to June 2020

Editor
Dr.Bapu G.Gholap

AnyScanner

# INDEX

01) Patna: An Important Centre of Medieval Economy
Dr. Deepti Kumari, Magadh Universiy (Bodh-Gaya) ||14

02) ON A NEW CESTODE OF GENUS GANGESIA WOODLAND, 1924 FROM FRESH ...
Dr. Garad V. K., Dist. Osmanabad ||19

03) THE STUDY OF PERSONALITY DISORDER IN THE CONTEXT OF PSYCHOLOGICAL ...
Dr. Nikita Jaiswal, Bhagalpur, Bihar, India ||22

04) Effect of Vitex nigundo L. On Leaf Spot of Turmeric Caused by Taphrina ...
Dr. J. A. Kadam, Dist. Latur [M.S.] ||25

05) Dalit Women and Human Rights Violation: Role of Caste, Class and Gender
Vijaya Kota, Telangana ||28

06) PERSPECTIVE OF TEACHER EDUCATION IN INDIA
Dr. ABHISHEK KULSHRESHTHA, MATHURA ||33

07) A Study of Challenges in Higher Education in India
Dr. Prabhakar S. Mahale, Dist. Jalgaon ||40

08) Role of Drama in a Teacher - Education Programme of Delhi
Neeraj Kumari, Delhi University ||42

09) EFFECT OF INQUIRY TRAINING MODEL ON BIO SCIENCE TEACHING IN HIGH ...
SHILPA PAUL, Jabalpur ||47

10) Green Library: An Overview
Mrs. Rakte Jyoti Bhausaheb, Dist. Beed ||49

11) VOCATIONAL INTREST and Socio Economic Status
Dr. Ritu Bhardwaj & Praveen Kumar Gautam ||54

12) Discrimination against Women
Dr. Sandeep Kr. Singh, Satyendra S. Chauhan & Dr. Anita Awasthi ||57

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

13) Digital Information Needs for Faculty of Vidyavardhaka First Grade College...
**Sunil Kumar R., Mysuru** ||62

14) ATROCITIES AND DALIT WOMEN: WITH SPECIAL REFERENCE TO GADHINGLAJ ...
**Vijay B. Musai, Dist. Kolhapur** ||65

15) भारतातील बुडीत बँका व गुतंवणुक संधी
**डॉ. वाकळे गोरखनाथ एकनाथ, नाशिक** ||69

16) दलित आत्मकथने आणि सामाजिकता
**प्रा.डॉ. आनंद वारके, जि. कोल्हापूर** ||72

17) विजेची बचत काळाची गरज
**प्रा. गायत्री चवाळे, अमरावती** ||75

18) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार
**प्रा. डी. जी. चिघळीकर, गडहिंग्लज** ||80

19) मराठेकालीन हेरवाड ग्राममधील भुईकोट किल्ला : एक ऐतिहासिक अभ्यास
**डॉ. डी. व्ही. सुर्यवंशी, कुरुंदवाड** ||83

20) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती आणि आव्हाने
**डॉ. ए. वाय. जाधव, चंदगड** ||86

21) बुलडाणा जिल्हयातील प्राथमिक शाळेत राबविण्यात येत असलेल्या 'बालकांचा ...
**डॉ. कनिज फातिमा & सुधीर यशवंता खिल्लारे, औरंगाबाद** ||90

22) ग्रामीण जनतेच्या विकासाकरीता आधुनिक पध्दतीने दुग्ध व्यवसाय व व्यवस्थापन
**प्रा.डॉ. मधुकर नक्षीणे, गडचिरोली** ||94

23) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषीक्षेत्राचे घटते मूल्य
**प्रसाद पांडुरंग दावणे, कोल्हापूर** ||99

24) ऐतिहासिक पर्यटनामध्ये महाराष्ट्रातील किल्ल्याचे योगदान
**प्रा.डॉ. सातपुते आर. बी., सातारा** ||102

25) समाज परिवर्तन चळवळीतील माणगांव परिषदेचे ऐतिहासिक महत्व
**प्रा. राहुल शंकर कांबळे, जि. सांगली** ||106

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

39) माध्यमिक शाला के विद्यार्थियों की शैक्षिक समस्या पर उनके सामंजस्य स्तर ...
डॉ. अरूण कुमार पोद्दार, बिलासपुर ||165

40) छत्तीसगढ़ राज्य की अर्थव्यवस्था के विकास के लिए रणनीतियों की आवश्यकता...
कु. मानवी शर्मा, रायपुर (छ. ग.) ||169

41) 'हिरखै दी पीड़' कविता–संग्रैह : मेरी नज़र च
राकेश कुमार शर्मा ||172

42) जहीर कुरेशी की ग़ज़लों में प्रेम निरुपण
प्रा. डॉ. कामिनी भवानीशंकर तिवारी, जि. जलगाँव ||176

43) उत्तराखण्ड में पर्यटन : चुनौतियाँ एवं सम्भावनायें
डॉ० पी० एन० तिवारी, रूद्रपुर (ऊधम सिंह नगर) ||179

44) प्रमुख पत्र, पत्रिका और समाचार पत्रों का परिचय
डॉ. संगीता शरणप्पा उप्पे, जि. लातूर ||187

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh, Tq.Dist.Beed-431 126
(Maharashtra) **Mob.09850203295**
E-mail: vidyawarta@gmail.com
**www.vidyawarta.com**

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



AnyScanner

25

# समाज परिवर्तन चळवळीतील माणगांव परिषदेचे ऐतिहासिक महत्व

प्रा. राहुल शंकर कांबळे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,
राजे रामराव महाविद्यालय जत, जि. सांगली

**********

## १) प्रास्ताविक:—

२० व्या शतकामध्ये भारतामध्ये वेगवेगळया ठिकाणी सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. त्यांचे नेतृत्व त्या त्या भागातील वेगवेगळया समाजसुधारकांनी केले. भारतीय समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा आणि चालीरिती यांच्या विरोधात समाजात जागृती घडवून आणून समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न करण्यात आले. त्याच प्रमाणे महाराष्ट्रात विविध समाज सुधारकांनी समाज प्रबोधन करुन समाजात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. यामध्ये प्रामुख्याने फुले — शाहू — आंबेडकर यांचे नाव घेतले जाते.

इंग्रज सत्तेच्या काळात महाराष्ट्रामधील कोल्हापूर संस्थांनामध्ये कोल्हापूरचे छत्रपती शाहू महाराज यांनी मोठया प्रमाणात समाजसुधारणा केल्या आहेत. त्यांनी आपल्या राजसत्तेचा उपयोग रयतेच्या कल्याणासाठी करण्याचा निश्चय केला होता. शाहू महाराजांनी आपल्या संस्थांनामधील लोकांमध्ये जाणीव जागृती करणे आणि त्याद्वारे समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले आहेत. त्यापैकी एक म्हणजे छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या वाढदिवसानिमित्त दिनांक २६ जुलै १९०२ साली आपल्या संस्थानातील नोकऱ्यांमध्ये मागासवर्गीय लोकांसाठी ५० टक्के राखीव जागा ठेवण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला होता. संस्थानातील सर्व जाती — धर्मांच्या लोकांसाठी शिक्षणाचे दरवाजे उघडले गेले, त्याप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी राहण्याची सोय म्हणून वस्तीगृहांची निर्मिती केली. इतर अनेक सामाजिक सुधारणांची पायाभरणी त्यांनी केली.

कोल्हापूर संस्थांनामधील कागल जहागिरीमध्ये असलेल्या माणगांव या गावी २१ व २२ मार्च १९२० रोजी अस्पृश्य समाजातील लोकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद भरविण्यात आली होती. त्या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच तुमचे खरे पुढारी आहेत आणि तेच तुमचे उध्दार करतील असा विश्वास छ. शाहू महाराजांनी बोलून दाखविला होता. त्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी तोच विश्वास सार्थ करुन दाखविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणजे भारतातील समाज सुधारकांच्या यादीतील अग्रक्रमाचे नाव आहे. त्यांनी आयुष्यभर अस्पृश्यांच्या हक्क आणि अधिकारांसाठी, त्याही पेक्षा देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अधिक काम केले आहे.

## २) माणगांव परिषदेचा इतिहास:—

दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाच्या लोकांची पहिली परिषद म्हणजे ''माणगांव परिषद'' होय. ही परिषद अनेक कारणांनी महत्वपूर्ण ठरली आहे. मानवी हक्कांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील चळवळींची ती एक सुरुवात होती. कारण ''खरे तर बाबासाहेबांच्या सार्वजनिक जीवनाची खरी सुरुवात या परिषदेच्या व्यासपीठावरुनच झाली. खुद्द बाबासाहेबांनी ही या गोष्टीची पुढे १९४० सालच्या कोल्हापूरातील एका समारंभात जाहीर कबुली दिलेली आहे.''[१]

२१ व २२ मार्च १९२० रोजी भरलेल्या या माणगांव परिषदेस जवळपास ५००० लोक उपस्थित होते. त्यादिवशी पाडव्याचा सण असून देखील मोठया संख्येने लोक हजर होते. या परिषदेसाठी माणगांवचे तत्कालिन गावकामगार पाटील आप्पासाहेब दादागोंडा पाटील यांनी खूप सहकार्य केले होते. त्याबरोबर अस्पृश्य समाजातील प्रमुख पुढारी थोरले नाना मास्तर, नागोजी कांबळे व त्यांच्या सहकाऱ्यांनीही परिश्रम घेतले होते.

२१ मार्च रोजी ५ वाजता परिषदेला सुरुवात

झाली. या परिषदेच्या स्वागत कमिटीचे अध्यक्ष श्री. दादासाहेब राजेसाहेब इनामदार यांचे भाषण झाले. त्यामध्ये त्यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश बोलून दाखविला. त्यानंतर या परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. आपल्या भाषणामध्ये त्यांनी अस्पृश्य वर्गाच्या परिस्थितीच्या परामर्श घेतला. 'नैसर्गिक गुण व सानुकुल परिस्थिती ही दोन उन्नतीची आद्य कारणे आहेत. बहिस्कृत वर्गात नैसर्गिक गुणांची वाण नाही, हे सर्वांस मान्य आहे. परंतु त्यांचा विकास होत नाही. याचे मूळ कारण त्यांना परिस्थिती सानुकूल नाही, हे होय. परिस्थिती सानुकूल करुन घेण्यास अनेक उपाय सुचविले जातात, परंतु या करिता आपण राजकिय सामर्थ्य संपादिले पाहिजे व जातवार प्रतिनिधीत्व मिळाल्याशिवाय आपल्या हाती राजकिय सामर्थ्य येणार नाही. 'सत्यमेव जयते' हे तत्व पोकळ आहे. सत्याचा जय होण्यास आपण आपली चळवळ कायम ठेवली पाहिजे, असे सांगून त्यांनी आपले प्रास्ताविक भाषण संपविले.''[२] अश्या प्रकारचे विचार त्यांनी या परिषदेमध्ये मांडले.

दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ मार्च रोजी परिषदेस छत्रपती शाहू महाराज उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणामध्ये त्यांच्या संस्थांनामध्ये अस्पृश्य वर्गाच्या उध्दारासाठी त्यांनी कोणकोणती कार्ये केली याची माहिती दिली. त्याचबरोबर त्यांनी परिषदेस जमलेल्या समुदायास उद्देशून बोलताना ते म्हणाले, ''माझ्या राज्यातील बहिष्कृत प्रजाजनांनो, तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला हयाबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर हे तुमचा उध्दार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एकवेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानाचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगते''[३] अश्या पध्दतीचा विश्वास त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल बोलून दाखविला व त्यानंतर डॉ. आंबेडरांना सोनतळी कॅम्पवर सहभोजनाचे आमंत्रण देऊन त्यांनी परिषदेचा निरोप घेतला. या परिषदेत १५ ठराव मंजूर करण्यात आले व ते ठराव संबंधित अधिकाऱ्यांकडे व गृहस्थांकडे पाठवण्याचा अधिकार हा अध्यक्षांना देण्यात येऊन ही परिषद संपली. ही परिषद समाज परिवर्तनाच्या वेगवेगळ्या कारणांसाठी महत्वाची ठरली आहे. त्यापैकी काही महत्वाचे मुद्देपुढील प्रमाणे;

**३) माणगांव परिषदेचे सामाजिक महत्व:—**

माणगांवच्या परिषदेला सामाजिक हितांच्या दृष्टीने खूप महत्व आहे. कारण ही परिषद अस्पृश्य समाजामध्ये जाणीव जागृती घडवून आणण्यासाठी भरविण्यात आली होती. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छ. शाहू महाराज यांनी उपस्थित समुदायाचे प्रबोधन केले त्याच प्रमाणे त्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले होते. त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी या परिषदेमध्ये 'मेलेल्या जनावरांचे मांस कोणत्याही जातीच्या माणसाने खाणे हा गुन्हा आहे असे कायदयाने मानले जावे असा या सभेचा अभिप्राय आहे''[४] हया पध्दतीचा ठराव (क्रं. १०) देखील करण्यात आला. तसेच आपला उध्दार आपणच केला पाहिजे, त्यासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत असे सांगून त्यांच्या मध्ये आत्मभान जागृत करुन त्यांचे मनोधैर्य उंचावण्याचा प्रयत्न केला, त्यांच्यामध्ये स्वाभिमानाची ज्योत पेटवली. आपल्यावरील अन्यायाविरोधात संघर्ष केला, तरच न्याय मिळेल असा विश्वास त्यामुळे समाजामध्ये निर्माण झाला.

माणगांव परिषदेमुळे अस्पृश्यांमध्ये एक वेगळया प्रकारचे चैतन्य निर्माण झाले. आपण ही इतरांसारखेच माणूस आहोत, अशा प्रकारची जाणीव निर्माण झाली. समाजामध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी 'सर्वत्र स्पृश्य व अस्पृश्यांच्या शाळा एकत्र असाव्या असे या परिषदेचे मत आहे.''[५] असा ठराव करण्यात आला. (क्रं. ८) जेणेकरुन समता प्रस्थापित होऊन भेदभाव नष्ट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

**४) माणगांव परिषदेचे राजकिय महत्व:—**

१९२० साली भरलेल्या माणगांव परिषदेला विशेष राजकिय महत्व आहे. कारण या परिषदेतूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सारखा नेता अस्पृश्य समाजाला मिळाला. तसेच या परिषदेत छ. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरच तुमचे उध्दारकर्ते आहेत आणि तेच तुमचा उध्दार करणार असा विश्वास बोलून दाखविला. परिणामी अस्पृश्य समाज हा डॉ.



AnyScanner

बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी ठामपणे उभा राहिला आणि डॉ. आंबेडकर यांनी देखील शाहू महाराजांनी दाखविलेला विश्वास सार्थ करत आपल्या समाजाला न्याय मिळवून दिला. या परिषदेमध्ये डॉ. आंबेडकरांनी भारतामध्ये असणाऱ्या अस्पृश्य समाजाला राजकिय हक्क आणि अधिकार मिळाले तरच अस्पृश्य समाजाची प्रगती होईल म्हणूनच त्यांनी या परिषदेच्या माध्यमांतून अस्पृश्यांच्या राजकिय हक्कांची मागणी केली. या परिषदेमध्ये जातवार प्रतिनिधीत्वाची मागणी ब्रिटिशांकडे करण्यात आली.

कायदेमंडळात बहिष्कृतांचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या व गरजेच्या प्रमाणात स्वतंत्र मतदार संघातून त्या प्रतिनिधींची निवड व्हावी अश्या पध्दतीची मागणी ही या परिषदेच्या माध्यमातून करण्यात आली. अस्पृश्य समाजाच्या प्रगतीसाठी राजकिय हक्क आणि अधिकार यांची नितांत आवश्यकता आहे हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहिष्कृतांच्या राजकिय अधिकारांसाठी लढत राहिले.

**५) माणगांव परिषदेचे आर्थिक महत्व:—**

मनुष्यमात्राला त्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पैसे हे अत्यंत महत्वाचे असतात, पण भारतातील जाती व्यवस्थेमुळे अस्पृश्यांचे प्रचंड आर्थिक शोषण होत होते. या परिषदेमध्ये अस्पृश्य समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी काही उपाय सांगण्यात आले. हजेरी सारख्या प्रथेमुळे त्यांचे प्रचंड हाल होत होते. त्यामुळे अस्पृश्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी अस्पृश्यांची वतनदारी संतुष्टात आणून शेतीचे झालेले छोटे – छोटे तुकडे एकत्र करुन ठराविक व्यक्तींना ती कसण्यास देण्यात यावी, कारण पिढयांपिढया हया वतनी जमिनींचे वाटप झाल्यामुळे त्यांचे छोटे – छोटे तुकडे झाले आहेत, त्यामुळे ती जमीन ठराविक व्यक्तीस कसण्यास दयावी जेणेकरुन त्यांची परिस्थिती सुधारेल तसेच ज्यांच्या जमिनी यामुळे जाणार होत्या त्यांना पड जमिनी रयताव्याच्या नियमाने देण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली, ज्यामुळे अस्पृश्य वर्गाची परिस्थिती सुधारेल. ''तलाठयांच्या जागांवर बहिष्कृत वर्गाच्या लोकांच्या नेमणूका होत जाव्यात, अशी या परिषदेमध्ये मागणी आहे''. अशा पध्दतीचा ठराव (क्रं. ११) करुन अस्पृश्य शिक्षित व्यक्तींना नोकरी देण्यात यावी असा विचार मांडण्यात आला. ज्यामुळे शिक्षण घेतल्यामुळे नोकरी मिळू शकेल, त्यामुळे अस्पृश्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास मदत होईल. आणि अस्पृश्य समाजास शिक्षणाचे महत्वही कळून येईल. अस्पृश्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी वरील उपाय हे खूपच ऐतिहासिक व क्रांतिकारक होते असे आपल्याला दिसून येते.

**६) माणगांव परिषदेचे धार्मिक महत्व:—**

माणगांव परिषदेचे धार्मिक महत्व म्हणजे पूर्वीपासून अस्पृश्य समाज हा आपल्या वाईट अवस्थेबद्दल, परिस्थितीबद्दल स्वत:च्या भाग्याला, नशिबाला दोष देत होता, परंतु नंतरच्या काळात त्यांना हे जाणवू लागले की आपल्या दुरावस्थेला ईश्वर जबाबदार नसून आपले वर्चस्व हे दुसऱ्यावर कायम रहावे, अशी इच्छा असणाऱ्यांनी ती निर्माण केली आणि त्याला धर्माचे स्वरुप देण्यात आले. जन्मजात श्रेष्ठत्व व कनिष्ठत्व यामुळे समाजाची विभागणी झाली. परिणामी कमी योग्यता असून देखील जन्मजात श्रेष्ठत्वामुळे वरिष्ठ वर्गातील लोकांचे कल्याण झाले. त्यामुळे या जन्मजात श्रेष्ठत्वाच्या विरोधात संघर्ष करण्याची भावना अस्पृश्य समाजामध्ये निर्माण होवू लागली. विशिष्ट वर्गाचे हित जोपासणाऱ्या धार्मिक रूढींविरोधात त्यांनी बंड पुकारायला सुरुवात केली.

**७) माणगांव परिषदेचे सांस्कृतिक महत्व:—**

प्रत्येक मानवी समाजाची एक संस्कृती असते, आणि त्या संस्कृतीवरुनच त्याची ओळख होते. पण काही संस्कृत्या या जाणीवपूर्वक एखादया समाजामध्ये त्यांच्या दुय्यमतेचे प्रतिक म्हणून रुजवल्या जातात. अशाच प्रकारच्या रूढी, परंपरा हया अस्पृश्य समाजाशी संबंधित होत्या, की ज्या पिढयांपिढया त्यांच्याकडून चालवल्या गेल्या. वतनदारीच्या नावाखाली त्यांचे मोठया प्रमाणात शोषण केले गेले. अशा पध्दतीची वतनदारी पध्दती की जिच्यावर कमीपणाची छठा होती, तिचे फेरफार किंवा बदल झाले पाहिजे. यासाठी "महार वतनदारांना पड वगैरे अगदी गलिच्छ कामे करावी लागत असल्यामुळे त्यांच्या वतनदारीवर कमीपणाची छटा उमटली आहे.''[७] असा ठराव (क्रं. ९) करण्यात

देऊन, त्यामध्ये फेरफार करण्याची मागणी करण्यात आली, ततसंबंधित गलिच्छ कामे करावी लागणार नाहीत, की जेणेकरुन त्यांच्या वतनदारीवरील कमीपणाची छटा दूर होईल, की ज्यामुळे अस्पृश्य समाजामध्ये आत्मसन्मानाची भावना जागृत होण्यासाठी मदत होईल. तसेच या परिषदेमध्ये छ. शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानांमध्ये बहिष्कृत समाजाच्या उध्दारासाठी केलेल्या कार्याची जाणीव ठेऊन त्यांचा सन्मान करण्यासाठी "श्रीमन्ममहाराज शाहू छत्रपती सरकार इलाखा करवीर यांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उध्दार करण्याचे सत्कृत आरंभिले आहे, याबद्दल त्यांचा वाढदिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा असे या परिषदेचे मत आहे."[८] अशा पध्दतीचा ठराव (क्रं. २) मांडण्यात आला होता. आज वर्तमान परिस्थितीत छ. शाहू महाराजांच्या कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांचा जन्मदिवस हा "सामाजिक न्याय दिन" म्हणून साजरा केला जातो. १९२० च्या माणगांव परिषदेमध्ये छ. शाहू महाराजांच्या कार्याचे महत्व ओळखण्यात आले होते, आणि त्यांचा सन्मान करण्यात आला होता.

**८) माणगांव परिषदेचे शैक्षणिक महत्वः—**

शिक्षण हे माणसाच्या उध्दाराचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. त्या जोरावरच माणूस आपली प्रगती करु शकतो. परंतु भारतातील जातीव्यवस्थेमुळे, वर्णव्यस्थेमुळे काही वर्गांना शिक्षणाचा अधिकार हा पूर्णपणे नाकारण्यात आलेला होता. अशा शिक्षण नाकारण्यात आलेल्या समाजघटकांची अवस्था खूपच दयनीय झालेली होती. ब्रिटिश राजवटीमध्ये वेगवेगळया मिशनरी व संस्था या शिक्षण प्रसार करु लागल्या होत्या. शिक्षणाचे दरवाजे सर्व जाती धर्मातील लोकांसाठी खुले झाले होते. त्यामुळे शिक्षणाचे महत्व सर्व जाती धर्माच्या लोकांना कळू लागले, तसेच ते अस्पृश्यांनाही शिक्षणांचे महत्व समजू लागले. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही परिस्थितीशी संघर्ष करुन शिक्षण घेतले होते. समाजाच्या विकासासाठी शिक्षण किती आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना झाली होती.

माणगावं परिषदेमध्ये अस्पृश्यांमध्ये शिक्षण प्रसार होण्यासाठी वेगवेगळया पध्दतीचे उपाय हे ठराव करुन त्यांची मागणी करण्यात आली. त्यामध्ये "प्राथमिक शिक्षण मुलामुलींचा भेद न करता जितक्या लवकर होईल, तितक्या लवकर सक्तीचे व मोफत करण्यात आले यावे".[९] अशा पध्दतीचा ठराव (क्रं. ५) करण्यात आला. यामुळे शिक्षणासाठी मुलगा व मुलगी असा भेदभाव न करता सर्वांना समान शिक्षण मिळाले पाहिजे, त्याचबरोबर परिस्थितीमुळे शिक्षणापासून कोणीही दूर जावू नये, यासाठी ते मोफत करण्यात यावे. तसेच त्या काळातील सर्वच लोकांना शिक्षणाचे महत्व समजले होते असे नाही. त्यामुळे हे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले होते.

बहिष्कृत समाजात शिक्षण प्रसार होण्यासाठी "म्हणून त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यास शाळा मास्तर, डेफ्युटी असिस्टंट, डेफ्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर त्यांचे हितेच्छू असले पाहिजेत. ज्याअर्थी, इतर वर्गातील माणसे बहिष्कृत वर्गाच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष किंबहुना अनुदारपणाही दाखवितात त्याअर्थी, वरील प्रकारचे अधिकऱ्यात बहिष्कृत वर्गातील माणसे असावीत असे या परिषदेचे मत आहे. तसेच बहिष्कृत वर्गाचे मास्तर ट्रेंड होण्यास त्यांना विशेष सवलत देऊन त्यांचा प्रवेश होण्याची सोय सरकारने करावी, अशी या परिषदेची आग्रहाची विनंती आहे. बहिष्कृत वर्गात शिक्षणाचा प्रसार करण्यास दरेक जिल्हाला बहिष्कृत वर्गापैकी निदान एक डेफ्युटी किंवा असिस्टंट डेफ्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर असावा व त्या दर्जाला ट्रेनिंग कॉलेजची थर्ड इयर परीक्षा पास झालेला किंवा मॅट्रिक पर्यंत शिकलेला इसम लायक समजला जावा असे या परिषदेचे मत आहे."[१०] अशा पध्दतीचा ठराव (क्रं. ६) करण्यात आला की जेणे, करुन अस्पृश्यांमध्ये शिक्षण प्रसार होण्यास मदत होईल. जर शिक्षण क्षेत्रातील वेगवेगळया पदांवर जर अस्पश्य समाजातील व्यक्ती असतील तर ते आपलेपणाच्या भावनेने आपल्या समाजात शिक्षण प्रसार करतील. त्यासाठी त्यांना काही सवलती मिळाल्या पाहिजेत असा देखील विचार मांडण्यात आला. त्याचबरोबर मध्यम व वरिष्ठ शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी 'खालसातील ज्याप्रमाणे मुसलमानांना

व म्हैसूर संस्थानातील बाह्यमणेत्तर व बहिष्कृत वर्गाच्या विद्यार्थ्यांना मध्यम व वरिष्ठ शिक्षणार्थ मुबलक शिष्यवृत्या दिल्या जात आहेत. त्याचप्रमाणे बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांना ब्रिटिश हद्दीत तशाच शिष्यवृत्या मिळाव्यात अशी या परिषदेची आग्रहाची विनंती आहे.'[११] अश्या पध्दतीचा ठराव (क्रं. ७) करुन प्राथमिक शिक्षणाबरोबरच अस्पृश्यांना मध्यम व वरिष्ठ शिक्षण देखील मिळाले पाहिजे असा विचार मांडण्यात आला.

अस्पृश्य समाजाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शिक्षण हे एकमेव साधन आहे त्यामुळे त्यांना ते मिळाले पाहिजे तरच त्यांचा विकास होणार. त्यामुळे आपल्याला असे दिसून येते की, अस्पृश्यां मध्ये शिक्षण प्रसार होण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी प्रयत्न केले आणि त्यामुळेच अस्पृश्य समाजाला शिक्षणाच्या संधी मिळत गेली आणि त्यामुळे अस्पृश्य समाज हा भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहात येऊ लागला.

**९) निष्कर्ष:—**

इंग्रजांच्या सत्तेखाली असलेल्या भारतात वेगवेगळया समाज सुधारणा चळवळी निर्माण झाल्या आणि त्यांनी समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या चळवळीला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. माणगांव परिषदेमध्ये मांडण्यात आलेले विचार हे फार दूरगामी स्वरुपाचे होते तसेच हे विचार नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीचा केंद्रबिंदू बनलेला आपल्याला दिसून येतो. अस्पृश्यते संदर्भात त्यांनी केलेले काम, अस्पृश्यांचा सामाजिक दर्जा, त्यांचे मनोबल उंचावण्यासाठी केलेले काम, शिक्षणासाठी केलेले काम आणि महत्वाचे म्हणजे अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांसाठी केलेल्या संघर्षातून अस्पृश्यांना मिळवून दिलेली राजकीय हक्कांची प्राप्ती या सर्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यातील महत्वाच्या गोष्टी आहेत, की ज्याची सुरुवात ही तत्कालीन कोल्हापूर संस्थांनातील कागल जहागिरीमधील माणगांवात २१ व २२ मार्च १९२० रोजीच्या परिषदेमध्ये झाली. म्हणून माणगांव परिषद ही एक ऐतिहासिक परिषद आहे. ज्याचा परिणाम हा भारतातील बहुजन समाजावर झाला.

**१०) संदर्भ सूची:—**

१) डॉ. पवार जयसिंगराव (संपादक): राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती जानेवारी २००१, पृ. क्रं. ९७

२) मुन वसंत, नरके हरि (संपादक): डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, खंड १८, भाग १, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र – साधने प्रकाशन समिती, मुंबई २००२, पृ. क्रं ३

३) कित्ता, पृ. क्रं. ४

४) कित्ता, पृ. क्रं. ६

५) कित्ता, पृ. क्रं. ५

६) कित्ता, पृ. क्रं. ६

७) कित्ता, पृ. क्रं. ५

८) कित्ता, पृ. क्रं. ४

९) कित्ता, पृ. क्रं. ५

१०) कित्ता, पृ. क्रं. ५

११) कित्ता, पृ. क्रं. ५

❑❑❑

Omkar Shikshan Prasarak Mandal's

# ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE

Gadhinglaj, Dist. Kolhapur, Maharashtra (☎ : 02327 -224405)

Affiliated to Shivaji University, Kolhapur

( Accredited by NAAC with 'B' Grade - CGPA -2.22)

One Day National Seminar on

## RECENT ISSUES & CHALLENGES IN LANGUAGES & SOCIAL SCIENCES

# Certificate

*This is to certify that Shri. / Smt.* Kamble Rahul Shankar

*of* Raje Ramrao Mahavidyalaya, Jat

*has actively participated in self financed* *One Day Inter Disciplinary National Seminar*

*on 22nd January, 2020 as delegate/*.................................. *and presented the research paper*

*entitled* समाज परिवर्तन -चळवळीतील माणगाव परिषदेचे ऐतिहासिक महत्व

**Asst. Prof. Bhimrao Shinde**
Convener

**Dr. Suresh Chavan**
I/c Principal

AnyScanner